## ६. निवड पध्दती:

६.१ ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या सर्वच उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेस बोलविण्यात येईल.

६.२ ऑनलाईन परीक्षेसाठी उमेदवारांना बोलविण्यापूर्वी त्यांच्या पात्रतेची पडताळणी केली जाणार नाही. त्यामुळे परीक्षेला बोलविले म्हणजे उमेदवार त्या पदासाठी पात्र आहे असे समजले जाणार नाही. उमेदवाराची अंतिम निवड ही त्याच्या पात्रतेसंबंधीच्या कागदपत्रांची पडताळणी करूनच केली जाईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६.३ अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तूनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा ही पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणीक अर्हता (Educational Qualification) व सामान्य अभियोग्यता चाचणी (General Apptitude) यावर आधारित राहील. ऑनलाईन परिक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील:-

| अनु.क्र. | विषय/उपविषय | प्रश्न | गुण | परिक्षा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | विजतंत्री व्यवसायातील विषयाचे ज्ञान (Professional Knowledge) | ५० | ११० | एकत्रित कालावधी १२० मिनीट |
| २. | सामान्य अभियोग्यता (General Aptitude)<br>अ) तर्कशक्ती (Reasoning)<br>ब) संख्यात्मक अभियोग्यता (Quantitative Aptitude)<br>क) मराठी भाषा (Marathi Language) | <br>४०<br>२०<br>२० | <br>२०<br>१०<br>१० | |
| | **एकूण** | **८०** | **४०** | |
| | **एकुण (१+२)** | **१३०** | **१५०** | |

६.४ उमेदवाराने दिलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांना शास्ती /दंड (Penalty) असेल. त्यानुसार त्या प्रश्नास विहित असलेल्या एकुण गुणांच्या १/४ (०.२५%) इतके गुण दंड म्हणून प्राप्त गुणांमधून वजा करण्यात येऊन अंतिम गुण काढण्यात येतील. तथापि, उमेदवाराने एखादया प्रश्नाचे उत्तर न दिल्यास / रिक्त ठेवल्यास अशा प्रश्नांना शास्ती / दंड (Penalty) लागणार नाही.



६.५ उमेदवाराने उपरोक्त नमुद विजतंत्री व्यवसायातील विषयाचे ज्ञान, सामान्य अभियोग्यता अंतर्गत तर्कशक्ती, संख्यात्मक अभियोग्यता व मराठी भाषा या सर्व विषयांचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त नमुद चाचणी परीक्षेतील कुठल्याही विषयात / उप विषयात उमेदवारास शून्य अथवा शून्यापेक्षा कमी गुण असल्यास सदर उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अशा उमेदवारांनी जरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविले असले तरी त्यांचा निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही याचीही उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६.६ उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेत मिळविलेल्या गुणांच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. तथापि, नियुक्तीपुर्वी उमेदवाराची विहित शारीरीक व वैद्यकीय चाचणी व तपासणी करण्यात येईल. या शारीरिक चाचणी/वैद्यकीय तपासणीत उमेदवारास पात्र होणे आवश्यक राहिल. याबाबतचे निकष निवडीपुर्वी प्रशासनातर्फे स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येतील. त्यामुळे उमेदवाराने अशा विहित केलेल्या शारिरिक व वैद्यकिय चाचणी/तपासणीत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहिल व तसे न झाल्यास सदर उमेदवाराने जरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविले असले तरी त्यांचा निवडीकरीता विचार करण्यात येणार नाही याचीही उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६.७ अंतिम गुणवत्ता यादी / निवडसुची तयार करतांना उमेदवारास ऑनलाईन परिक्षेत एकुण १५० गुणांपैकी मिळविलेल्या गुणांचे रुपांतरण १०० गुणांत करुन अंतिम यादी/निवडसुची तयार करण्यात येईल. अंतिम निवड यादीत स्थान मिळविण्याकरीता खुल्या प्रवर्गातील उमेदवारास १०० गुणांपैकी कमीत कमी ३० गुण आणि मागास प्रवर्गातील व समांतर आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारास १०० गुणांपैकी कमीत कमी २० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. उमेदवाराने तेवढे कमीत कमी गुण प्राप्त न केल्यास त्याची निवड होणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व निवड यादी त्या मर्यादेत राखण्यात येईल.

६.८ दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठताक्रम (वयाने जेष्ठ असणाऱ्यास प्राधान्य) ठरविण्यात येईल.

६.९ प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने समांतर आरक्षणांतर्गत निवडीकरीता शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि.१३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुद्धिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दि. १९ डिसेंबर, २०१८ च्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

६.१० सामान्यत: उपरोक्त नमुद केलेल्या निवड पद्धतीचे अनुसरण करण्यात येईल. तथापि, कोणत्या निवड पद्धतीचा अवलंब करायचा हे ठरविण्याचा अधिकार व निर्णय पुर्णपणे कंपनी प्रशासनाचा असेल.